**Dr.Kirit Somaiya**
B. Com., F.C.A. Ph. D
Ex - Member of Parliament

*All India Convenor : BJP Investors' Cell*
*Vice President : BJP - Maharashtra*

## कृपया प्रसिध्दीसाठी

### १५ दिवसात मिठी नदीचे काम पूर्ण करा – उच्च न्यायालय

### किरीट सोमैयांच्या याचिकेच्या सुनावणीत मिठी नदीचे संरक्षण करण्याचे निर्देश

मुंबई : बुधवार दि. ०७ जून, २००६

येत्या १५ दिवसांत मिठी नदीचे १०० टक्के काम पूर्ण करण्याचे निर्देश आज मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले. भाजपा नेते डॉ.किरीट सोमैया यांच्या जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी नदीचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारावी व नवीन अतिक्रमणापासून वाचविण्याचेही आदेश न्या.आर.एम. लोढा आणि न्या.ए.एस. बग्गा यांच्या खंडपीठाने आज दिले. नदी काठावर पुन्हा झोपडपट्टी दादांनी अतिक्रमण सुरू केल्याचे फोटो व पुरावे डॉ.सोमैया यांनी न्यायालयात सादर केले. अतिक्रमण होत असल्याचे शासनाने मान्य केले असून आता नदीच्या तटाच्या आसपास विशेषकरुन माहीम खाडी, मिठीच्या मुखाजवळ पोलीस तैनात करण्याचे ॲडव्होकेट जनरल रवी कदम यांनी मान्य केले.

न्यायालयात सादर करण्यात आलेल्या चौथ्या अहवालात शासनाच्या वतीने १०-१५ टक्के काम शिल्लक असल्याचे मान्य करण्यात आले. सोमैयांच्या वतीने त्यांचे वकील ॲड.जनक द्वारकादास यांनी न्यायालयात किरीट सोमैया यांनी आज सकाळी ७.०० वाजल्यापासून मिठी नदीच्या कामाची पाहणी करुन काढलेल्या फोटोसह अहवाल सादर केला. ११ भागापैकी ८ भागांचे काम बऱ्यापैकी पूर्ण झाल्याचे ॲड.जनरल द्वारकादास यांनी न्यायालयाला सांगितले.

एअरपोर्ट ते सी.एस.टी. रोड या महानगरपालिकेच्या कामात अर्ध्याहून अधिक काम शिल्लक आहे. एमएमआरडीए कडील सीएसटी रोड ते बांद्रा-कुर्ला परिसर तसेच माहीम खाडीच्या झोनमध्येही मोठ्या प्रमाणात काम शिल्लक असल्याचे निदर्शनास आणून दिले. २ लाख घनमीटर रुंदीकरण किंवा गाळ हलविण्याचे काम अजून शिल्लक आहे. महानगरपालिकेचे ॲड.सिंघवी आणि राज्य शासनाच्या वतीने ॲड.रवी कदम यांनी हे काम २८ जून पूर्वी पूर्ण करण्याचे मान्य केले.

न्या.आर.एस.लोढा यांनी मिठी नदीच्या शुद्धीकरणासाठी याचिकाकर्ता किरीट सोमैया व अन्य एजन्सींनी सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद दिले. तसेच २८ जून रोजी पुढची सुनावणी ठेवण्यात आली असून तोपर्यंत मिठी नदीचे १०० टक्के काम पूर्ण करावे, अशी आशा व्यक्त करून निर्देशही दिले.

पहिल्या टप्प्यात एकंदर १३,२०,३५१ घनमीटर गाळ व माती काढण्याचे लक्ष्य आहे. मुंबई प्राधिकरणाने ७,६३,३५१ घनमीटर तसेच मुंबई महानगरपालिकेने ५,५७,००० घनमीटर गाळ काढण्याचे व रुंदीकरणाचे काम करावयाचे आहे. आतापर्यंत सुमारे ११ लाख घनमीटरहून अधिक गाळ काढून तो डम्पींग ग्राऊंडमध्ये हलविण्याचे व रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. दि. २८ जूनपर्यंत संबंध १९ कि.मी. लांबीची मिठी नदी सलग १०० फुट रुंद होईल. मिठी नदीचे मुख म्हणजे माहीम खाडीजवळ थोडे काम शिल्लक राहणार आहे ते पावसाळ्यानंतर करावे लागेल.

प्रसिद्धी सचिव

**BJP OFFICE :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110001
● Neelam Nagar, Mumbai 400081, Tel : 25644151, E-mail : kirit@vsnl.in